देशोन्नती दि. ०५/०३/२०२१

# चोरीस गेलेल्या ३३ मोटारसायकली 'स्थागुशा'च्या ताब्यात

देशोन्नती दि. ०५/०३/२०२१

## दोघे जण ताब्यात, १४ लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ शहर व जिल्ह्यात धुमाकुळ घातलेल्या मोटारसायकल चोरणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने २ मार्च रोजी पर्दाफाश केला. यामध्ये चिखली येथील तिघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून १४ लाख ८५ हजार रुपये किंमतीच्या ३३ मोटारसायकली जप्त केल्याची माहिती पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

शहर व जिल्ह्यात मोटारसायकली चोरणाऱ्या चोरट्यांचा शोध घेण्याचे आदेश पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे व विजय कबाडे यांनी दिले त्यानुसार स्थागुशाचे पोनि. द्वारकादास चिखलीकर यांनी स्थापन केलेल्या पथकामार्फत चोरट्यांची शोधमोहीम सुरु केली. दरम्यान मिळालेल्या गुप्त



माहितीवरुन सदर पथकास कंधार तालुक्याती चिखली येथील सरवर शेरखान पठाण व त्याचे साथीदार चोरीच्या मोटारसायकली ताब्यात बाळगून विष्णुपूरी येथील शासकीय रुग्णालयाच्या परिसरात फिरत असल्याची गुप्त माहिती मिळाली. या माहितीवरुन सपोनि. पांडुरंग भारती, पोउपनि. आशिष बोराटे, प्रवीण राठोड व भानुदास वडजे यांच्या पथकाने शासकीय रुग्णालयाच्या परिसरात सापळा रचून २ मार्च रोजी मोटारसायकल मेकॅनिक सरवर शेरखान पठाण (२२), मिरसाब उर्फ चाऊस अब्दुल शेख (२४) व गोविंद दिगांबर कदम (२०) या तिघांना ताब्यात घेवून चौकशी केली असता त्यांनी नांदेड शहर व ग्रामीण भागातून मोटारसायकली चोरुन चिखली, मारतळा, कलंबर व अहमदपूर या भागात विक्री केल्याचे सांगितले. यावेळी पोलिस पथकाने चिखली येथून २५ मोटारसायकली, मारतळा येथे १, अहमदपूर येथील ३, कलंबर येथे १, नांदेड शहरात २ व नरसी येथून १ अशा एकूण ३३ मोटारसायकली जप्त केल्या. या पथकात गोविंद मुंडे, मारोती तेलंगे, दशरथ जांभळीकर, बालाजी तेलंग, सुरेश घुगे, अफजल पठाण, विलास कदम, तानाजी येळगे, देवा चव्हाण, राजू सिटीकर व इतर कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याचे सांगितले. या पत्रकार परिषदेत अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, विजय कबाडे, डॉ. सिद्धेश्वर धुमाळ व स्थागुशाचे पोनि. द्वारकादास चिखलीकर उपस्थित होते.

स्थागुशाच्या पथकाने यापूर्वी नायगाव, नांदेड ग्रामीण व रामतीर्थ पोलिस ठाण्याच्या हद्दीतून ६२ मोटारसायकली जप्त करुन २२ आरोपींना अटक केली. त्यानंतर नांदेड ग्रामीण व इतवारा हद्दीत २७ लाख ७ हजार ८५ रुपये किंमतीचे १०० मोटारसायकलीचे सुटे भाग जप्त करुन ६ आरोपींना अटक केली आहे.